Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-XI Nov. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शांतता व शांततेसाठी शिक्षण

सीमा शिवाजी सावंत
श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे
प्रताप ज्युनि. कॉलेज ऑफ एज्यु. वडणगे निगवे दु!!
ता. करवीर जि. कोल्हापूर

दैंनदिन जीवनात ताणतणाव, ईर्ष्या,द्वेषभावना, अशांत मने, भावनिक उद्रेक, समन्वयाचा अभाव, अमानवी अतिरेकी वृत्ती,सूडबुद्धी, अत्याचार, दंगे, दहशतवाद यासारख्या बाबी सद्यस्थितीत वाढीस लागलेल्या आहेत. यातून समाजविघातक शक्ती निर्माण होत आहे. अशा समजविघातक शक्तीपासून देशाचे व जगाचे अस्तित्व टिकवायचे असेल तर समाजात शांतता निर्माण करणे व शांतता निर्माण होण्याच्या दृष्टीकोणातून शिक्षण देणे गरजेचे आहे.

## शांतता–(Peace)

जगाच्या पाठीवर प्रत्येक व्यक्तीला शांतता आवश्यक आहे. शांतता ही मानवी जीवनाची अंतिम आवश्यक बाब आहे. शांतता हे साध्य आणि साधन दोन्ही आहे. शांततेशिवाय विकासतर नाही विकासाची सुरुवातही होत नाही.

भारत हा शांततामय देश आहे. विश्वशांतीचा संदेश देणारे संत ज्ञानेश्वर, गौतम बुद्ध, रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी, महात्मा गांधी हे शांततेचे दूत या मातीतच जन्मले.

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन साहित्यात 'शांतता' या शब्दाचा उल्लेख केलेला दिसून येतो. विष्णूपुराणामध्ये ''त्यागामध्ये निरंतर शांतीचा वास असतो'' असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरीमध्ये ''ज्ञेयाला जिरवून जेव्हा ज्ञाता आणि ज्ञान दोन्ही लयाला जातात तेव्हा त्या स्थितीला शांती म्हणावे'' असे म्हटले आहे.

Jesus Christ, "I say to you, love your enemies, and pray for those who curse you, do good to those who hate you, and pray for those who persecute you, so that you may be sons of your Father in heaven."

यशू ख्रिस्ताच्या मते, द्वेषाने जिंकू शकत नाही तर प्रेमाने त्यांच्यावर मात करता येते. शत्रुवरही प्रेम करा. शत्रुच्या चांगलयासाठी प्रार्थना करा मग तुम्ही परमेश्वराचे पुत्र व्हाल. Islam, "My Lord, who is the greatest of Thy servants in Thy estimation"इस्लामच्या मते,सर्वशक्तीमान असताना जो चुका माफ करतो तोच तुझा सर्वोकृष्ठ सेवक होय.

बुद्धांच्या मते,"We are what we think. All that we are arises with our thoughts. With our thoughts, we make the world."आपण जे आहोत ते आपल्या विचारामुळे आहोत आपल्या चांगल्या विचाराच्या उगमस्थानाने आपण जग तयार करु शकतो.

Mahatma Gandhi, "When I despair, I remember that all through history the ways of truth and love have always won."गांधीच्या मते,ज्यावेळी मी वैफल्यग्रस्त असतो त्यावेळी मला आठवतं आजपर्यंतच्या इतिहासात नेहमीच सत्य आणि प्रेमाचा विजय होतो.


UNESCO( United Nations Educational, scientific & cultural Organization) च्या प्रस्ताविकेत म्हटले आहे"Since wars begin in the minds of men, it is in the minds of men that the defenses of peace must be constructed." ज्यावेळी माणसच्या व्यक्तीच्या मनामध्ये युद्धाची सुरुवात होते त्यावरचा उपायही मानवी मनातच आहे.

शांतता ही संकल्पना खूप व्यापक आहे. शांतता वैयक्तिक व सामाजिक अशा दोन पातळीवर विभागता येईल. सद:स्थितीत प्रत्येक राष्ट्रामध्ये अशांतता आहे हे मान्य आहे पण याचे मुळ हे वैयक्तिक अशांततेत आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कारणाने असंतुष्ट, असमाधानी आहे.अगदी झोपडीत राहणाऱ्या दरिद्री माणसापासून ते महालात राहणाऱ्या श्रीमंतापर्यंत, सर्वसामान्य ते उच्च पदस्थापर्यंत सर्वच या बाबतीत असमाधानी दिसून येतात. सुख समाधान मिळूनही मन मात्र अतृप्त, अशांत, भावनिक गोंधळ निर्माण करणारी अवस्था पहावयास मिळते. व्यक्तीने आपले दैनंदिन जीवन सामंजस्याने, समाधानाने, सामाजिक बांधीलकीने तृप्ततेने व्यतीत करणे म्हणजे वैचारिक शांतता निर्माण झाली असे म्हणता येईल. तर व्यापक विचार हीच समाज पातळी होय. समाज निर्मीतीचा प्रमुख घटक व्यक्ती आहे अनेक व्यक्तींचा समुह मिळून समाज तयार होतो. त्यामुळे समाजाची शांतता ही वैयक्तिक शांततेवर, वैयक्तिक शांततेच्या पायावर उभी राहिली आहे. जागतिक शांतता नांदावी यासाठी अनेक राष्ट्रांनी एकत्र येवून विकासाकडे वाटचाल करताना सद्विचाराची देवाणघेवाण करणे केवळ आपल्यापुरता विचार न करता प्रत्येक व्यक्ती, राष्ट्र यांनी बहुजनांचा, इतरांचा विचार करावा हेच व्यापक विचार सामाजिक पातळीवर शांतता निर्माण करण्याचे मार्ग आहेत.


वरील संकल्पनावरुन शांततेचा अर्थ –

१ वादविवादापासून मुक्ती हीच शांतता होय.
२ युद्धाचा अभाव म्हणजे शांतता होय.
३ निरोगी नातेसंबंध व समाज म्हणजे शांतता.
४ अराजकता, गोंधळ नाही अशी स्थिती म्हणजे शांतता.
५ समेट, सलोखा सामंजस्यपणा म्हणजे शांतता.


थोर महान व्यक्ती धर्मातील तत्त्वे यांचा विचार करता मतभेद, तंटे, वाद, अन्याय, अत्याचार, युद्ध या सर्वाला मानवी मन कारणीभूत ठरते. मानवी मन हे द्विहेतूने कार्य करत असते.





जेव्हा मन स्वत:साठी कार्य करते तेव्हा ते शरीराचे कार्य. आपली इंद्रीये ज्याप्रमाणे आज्ञा देतील तसे आपण कार्य करतो आणि सर्वांसाठी कार्य म्हणजे मनाचे कार्य. इंद्रीयावर ताबा मिळवून आपण जे काम करतो ते सर्वांसाठी असते. म्हणजे मानवी मन शरीर (स्वत:साठी) व मन (सर्वांसाठी) अशा दोन हेतूंनी कार्य करीत असते. व त्यातून स्वार्थी व निस्वार्थी विचार व कृती घडत असते.




ज्यावेळी व्यक्ती स्वार्थी विचार करते त्यावेळी ती स्वत:साठी जगत असते, स्वत:साठी विचार करते आणि स्वार्थी विचारातून लोभ, अहंकार, शोषण, अन्याय, हव्यास, सूड यासारखी संघर्षाची कारणे उदयास येतात.



याउलट ज्यावेळी व्यक्ती निस्वार्थी विचार करतो त्यावेळी ती दुसऱ्यासाठी जगत असते आणि दुसऱ्याबद्दल विचार करण्याच्या वृत्तीमधूनच संयम, सेवा, चांगुलपणा, दानशूरपणा, माणुसकी या गोष्टी वाढीस लागतात.




म्हणजेच शांतता ही मनातच निर्माण व्हावी लागते. बुद्धीपेक्षा मनातच युद्धाची भावना तयार होते. म्हणून शांततेचे संस्कार मनावर करण्याची जबाबदारी शिक्षणावर पर्यायाने शिक्षकावर आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी :–

पहिल्या महायुध्दाच्या परिणामावर उपाय म्हणून १९१८ मध्ये जागतिक शांतता हा विचार प्रवाह सुरू झाला पण त्याचा ठोस परिणाम झाला नाही दुसऱ्या महायुध्दात सैनिकांचा मृत्यू, औद्योगिक केंद्रे नष्ट, आर्थिक शक्ती वाया गेली, अर्थव्यवस्था कोलमडली. हिरोशिमा व नागासकी या शहरावर अणुबॉंब टाकले गेले व जागतिक अशांतता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर १९४५ ला युनोची स्थापना झाली आणि युनोच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश राष्ट्राराष्ट्रातील मतभेद दूर करून शांतता प्रस्थापित करणे हा होता. पुढे UNESCO ची स्थापना शांतता निर्माण करण्यासाठी झाली. १९१९ मध्ये स्वीडनमध्ये 'The Peace Association of Swedish School' ची स्थापना झाली.

अमेरिकेत १९४८ मध्ये शांततेसाठी शिक्षण हा विद्यापीठ पातळीवर प्रमुख विषय ठेवला यानंतर जवळ जवळ एक वर्षानी अमेरिकेतील काही विद्यापीठामध्ये शांततेसाठी शिक्षणाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.

पुढे १९८० ला स्वीडनमध्ये 'शांततेसाठी शिक्षण' हा कार्यक्रम भरला व त्यातून जपान, जर्मनी, आफ्रिका या सर्वच देशामध्ये शांततेसाठीच्या शिक्षणाचे उपक्रम चालू केले गेले.

१९८९ मध्ये आफ्रिकेत 'मानवाच्या मनातील शांतता' या वर एक आंतरराष्ट्रीय परिषद झाली या परिषदेने युनेस्को वर शांततवादी संस्कृती निर्माण करण्यासाठी जबाबदारी दिली. १९९५ च्या

युनेस्कोच्या सर्वसाधारण सभेत १९९६–२००१ या काळामध्ये शांततेसाठी भरीव प्रयत्न करण्यासाठी विचार झाला. व १९९८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ‘२०००–२०१०’ हे दशक ‘शांततावादी आणि अहिंसावादी’ संस्कृतीचे आंतरराष्ट्रीय दशक म्हणून जाहीर केले. २००२ मध्ये United Nations resolution ने २१ सप्टेंबर हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय शांतता दिवस’ म्हणून जाहीर केला.

तसेच भारतात गुजरातमध्ये एम.ए. पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी हा विषय आहे. तसेच UNO मध्ये राजीव गांधी केंद्राची स्थापना केली आहे.

शांततेसाठी शिक्षण–

शांततेसाठीच्या शिक्षणाची खिस्तोफर वुल्फ यांची व्याख्या “Peace Education deals with conditions within society which toaster violence induding elements of violence in the family & the school.”

शांततेसाठी शिक्षण हे शाळा व समाज यांच्यामधील हिंसाचाराच्या परिस्थितीशी निगडित आहे.

NCERT अभ्यासक्रम आराखडा २००५नुसार शांततेसाठी शिक्षण म्हणजे स्वत:बरोबर व निसर्गासहित इतराबरोबर सुसंवाद साधण्यासाठी आवश्यक असणारी मूल्ये, दृष्टीकोन, आणि कौशल्ये रुजवण्यासाठी दिले जाणारे शिक्षण होय.

१९९३ ते १९९६ च्या काळात २१ व्या शतकातील शिक्षणावर विचार करण्यासाठी युनेस्कोने डॉ जेकॉब डेलॉर्सच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला त्याला डेलॉर्स कमिशन असेही म्हणतात. या आयोगाने शिक्षणाचे चार आधारस्तंभ सांगितले आहेत. त्यामध्ये

1- माहिती करुन घेणेस शिक्षण देणे (Learn to know)
2- कृती करण्यास शिकणे (Learn to do)
3- एकत्र राहण्यास शिकणे (Learn to live together)
4- व्यक्तीमत्व विकास साधण्यास शिकणे (Learn to be)

यापैकी एकत्र राहण्यास शिकणे (Learn to live together) या आधारस्तंभाचे वैशिष्टे सांगताना कमिशनने म्हटले आहे की, ‘इतरांची संस्कृती आणि आध्यात्मिक मूल्ये यांचा आदर निर्माण केल्यास तंटे कलह टाळणे किंवा शांततेने मिटविणे शक्य आहे. या गोष्टी शिक्षणातून साधता येतील. युनेस्कोने मांडलेल्या शिक्षणाच्या चार आधारस्तंभावरुन शांततेसाठी शिक्षण ही जगाची गरज झालेली पाहावयास मिळते.

शांततेसाठी शिक्षण गरज व महत्व:

आजकालच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या व यांत्रिक युगात मानवी जीवन यांत्रिक बनत चालले आहे. मूलभूत गरजा भागविताना समाजामध्ये वावरताना, व्यक्तीचे इतराबरोबरचे संबंध निरोगी

नसतील तर त्याला संघर्षाला तोंड द्यावे लागते. व्यक्तीला इतराबरोबर सलोख्याने राहण्यासाठी मार्गदर्शन मिळावे म्हणून शांततेसाठीच्या शिक्षणाची गरज आहे.

१ स्वत:मधील कलह दूर करण्यासाठी.

२ कौटुंबिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, आंतरसंबंधातील कलह, मतभेद दूर करण्यासाठी .

३ सुरक्षितता वाढविण्यासाठी प्रत्येक राष्ट्र सावधान असण्याबरोबरच शांतता निर्माण करण्यासाठी .

४ विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर सुज्ञपणे करण्यासाठी.

समारोप–

जगातील सर्व लोकांना शांततेने व सामंजस्याने जगावे वाटते. शिक्षणाद्वारे शांतता नांदावयाची असेल तर 'मी' व 'माझे' ही गोष्ट मानवी मनात युद्ध सुरु होण्यास कारणीभूत आहे. त्याऐवजी 'आपण' हा शब्दप्रयोग मुलांच्या मनावर ठसवावयास हवा. जगात अस्तीत्वात असणारे सर्व धर्माची तत्त्वे त्याचबरोबर शांततेसाठी कार्य करणाऱ्या संस्था ज्ञानेश्वरीतील पसायदानाचा अर्थ सांगतात.

सध्याच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मानव भौतिकवादाकडे वळला आहे त्यामुळे आंतरिक व बाह्य शांततेपासून दूर जात आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भूमिका सर्व मानवजातीमध्ये रुजवायची असेल तर शांततेसाठीच्या शिक्षणाची गरज आहे. अन्यथा मानवाला पुन्हा इतिहास (अश्मयुग) अनुभवण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भसूची**

१. कदम व्ही. के (२०१२), वर्तमान शिक्षण, शिक्षक शिक्षण, पुणे : विद्या प्रकाशन
२. नानकर पी. एल., शिरोडे एस. एन. (२०१०) वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह, पुणे : नित्यनुतन प्रकाशन
३. कुलकर्णी के. व्ही. व काळदाते एस. (२००८) उदयोन्मुख भारतीय समाज, संस्कृती आणि शिक्षण, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
४. सांगोळकर ए. एस. (२०११), नवीन जगातील समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह नाशिक: इनसाईट प्रकाशन.
५. भोसले आर. ए. व डोणे यु. एम. शिक्षणातील बदलते विचारप्रवाह
६. जाधव के.के. (२००८), नवीन काळाचे शिक्षण नाशिक: मन प्रकाशन.
7. Kiruba C & V Arul Selvi, Peace And Value Education, Chennai: Neelkamal Publication Pvt. Ltd.
8. Bhattacharya A. S. (2000), Foundation of Education, New Delhi: Atlantic Publishers & Distributors.
9. http://eric.edgov / ?research+for+education+for+peace & id = EJ102234:
10. Instruction of the Nonviolent communication and peace course.
11. http://eic.ed gov/?research + for + education+for+peach&id=EJ976239,
12. Elise Bouldning And Peace Education: Theory, Practice And Quaker Faith.